डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

# कृषि विज्ञान केंद्र

सेलसुरा ता.जि.वर्धा - ४४२१०१ (महाराष्ट्र)

ICAR

डॉ.जिवन रा. कतोरे
वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

फोन -८२७५४१२०१२
Email - kvkselsura@pdkv.ac.in / kvk.wardha@gmail.com

जा.क.कृविके/सेलसुरा/दरपत्रक/१३१ /२०२३ दिनांक ३१/१/२०२३

## दरपत्रक सुचना (तिसरी वेळ)

**विषय :-कृषि विज्ञान केंद्र, सेलुसरा जि.वर्धा या कार्यालयाकरीता कंत्राटी पध्दतीने बाहयस्त्रोतामार्फत मुनष्यबळ (कुशल / अकुशल कामगार) पुरविण्याकरीता दरपत्रक सादर करणेबाबत.**

यासुचनेव्दारे,कृषि विज्ञान केंद्र, सेलुसरा जि.वर्धा या कार्यालयाकरीता कंत्राटदार /संस्था बाहयस्त्रोताकडुन मुनष्यबळ (कुशल आणि अकुशल कामगार/मजूर) पुरविण्याकरीता खालील तक्त्यात नमुद केल्यानुसार दरपत्रक या कार्यालयास दिनांक १०/०२/२०२३ रोजी सायंकाळी ६.१५ वाजेपंर्यत सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये सादर करावे. अंतिम दिनांकानंतर प्राप्तदरपत्रक ग्राहय धरण्यात येणार नाही.

| अ.क्र. | मनुष्यबळ | संख्या | कामाचा वेळ प्रती व्यक्ती | शेरा |
|---|---|---|---|---|
| **खालीलनुसार कुशल कामगार /मजुर** | | | | |
| १ | कुशल कामगार (कार्यालयीन/प्रयोगशाळा कामकाज) | ०१ | ८ तास | |
| **खालीलनुसार अकुशल कामगार /मजुर** | | | | |
| २ | अकुशल मजुर | ०१ | ८ तास | |

**कंत्राटदाराने दर पत्रकामध्ये दर नमुद करण्यापुर्वी खालील सुचना, शर्ती व अटींचे काळजीपूर्वकअवलोकन करावे.**

**सुचना :**

१. वरिल नमुद अकुशल मजुरांना प्रक्षेत्रावर शेतीसंबंधीत कामामध्ये वरिष्ठांव्दारे निर्देशीत काम करावे लागेल.

२. वरिल नमुद अकुशल मजुरांना शेळीपालन / कुक्कुटपालन / आळींबी लागवड / ॲझोला उत्पादन / तसेच पिकांवर फवारणी, डवरणी, निंदणी आंतरमशागत इत्यादी कामे करावे लागतील.

३. प्रक्षेत्रावरील गरजेनुसार तसेच अनुदान उपलब्धतेनुसार वरील तक्त्यात नमुद मनुष्यबळ संख्या कमी अथवा जास्त होण्याची शक्यता असेल.

४. कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा हे कार्यालय डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला अंतर्गत शासकीय संस्था असल्यामुळे मनुष्यबळ पुरविण्यासाठी (GST) लागु नाही.

५. दरपत्रके अंतिम दिनांका पर्यंत कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेतच स्विकारले जातील,शासकीय सुटीच्या दिवशी स्विकारण्यात येणार नाहीत.

Scanned with CamScanner

९. कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा जि.वर्धा या कार्यालयाने निश्चित केलेल्या नियम व अटी मान्य असल्याचे प्रमाणपत्र तसेच कोणत्याही शासकीय /निमशासकीय कार्यालयाच्या काळया यादीत नाव नसल्याचे स्वयंघोषीत प्रमाणपत्र कंत्राटदाराने सादर करावे.

१०.कंत्राटदाराने दरपत्रकात कंत्राटी मजुराला देय असलेले किमान वेतन व कामगार कायदयातील इतर तरतुदीपेक्षा कमी रक्कम नमुद करू नये थोडक्यात कृषि विद्यापीठ यांच्यासाठी निर्धारीत केलेले दर नमुदकरावेत. कंत्राट दाराचे कमीशन वरच दरपत्रक निश्चित करण्यात येईल. किमान वेतन कायदयानुसार कंत्राटी कामगारास वेतन देणे बंधनकारक राहील.

११.सेवा पुरविणा-या कंत्राटदारास बालमजुरकायदयाचे पालन करणे बंधनकारक राहील.

१२.कंत्राटदाराने नेमलेल्या कामगाराचा पगार, रजा,ग्रॅच्युएटी, बोनस, विमा योजना,पि.एफ,ई.एस.आय.सी इत्यादी देय बाबी तसेच वेळोवेळी शासनाच्या निर्देशानुसार देय/वेतन देण्याची सर्व जबाबदारी कंत्राटदारांची राहील याबाबतीत काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाहीत अथवा कोणतीही जबाबदारी या कार्यालयाची अथवा विद्यापीठाची राहणार नाही.

१३.कंत्राटदाराने महाराष्ट्र शासनाच्या कंत्राटी कामगार किमान वेतन कायदयानुसार आवश्यक ते सर्व अभिलेख उदा. हजेरीनोंद, वेतन वाटप नोंद, दैनदिन कामाच्या नोंदी इत्यादी नोंदवहया ठेवणे व ते संबंधीत प्राधिकरणाव्दारे तपासुन घेणे बंधनकारक असून, त्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदार/पुरवठादाराची राहील.

१४.कामगारच्या वैयक्तीक खात्यावर पि.एफ.विमा व इतर भरणा केलेले चलान/पावती प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आठवडयात देयक सादरकरते वेळी सादर करणे बधंनकारक राहील.

१५.प्रत्येक कामगारास साप्ताहिक सुटटी देणे बंधनकारक राहील याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदारांची राहील.

१६.शासकीय विमा निधी व कामगार कायद्यानुसार शासनाने वेळोवेळी ठरवून दिलेल्या नियंमाची पूर्तता करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१७.प्रत्येक कंत्राटी मजुराच कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट मधील नमुन्याप्रमाणे ओळखपत्र देणे कंत्राटदारास बंधनकारक असुन कामाच्या दिवशी सदरील ओळखपत्र कामगाराकडे असणे गरजेचे आहे.

१८.कंत्राटी मजुरास कामकरतेवेळी इजा,अपघात अथवा मुत्यू संभविल्यास किंवा नैसर्गिक आपत्तीउदा. विज, पाऊस भूकंप, मशीनरी, प्राणी आणि वादळामुळे इजा,अपघात अथवा मुत्युसंभविल्यास त्याची सर्व भरपाई आणि इतरकायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील याचा या कार्यालयाशी अथवा विद्यापीठाशी कुठलाही प्रकारचा संबंध राहणार नाही.

१९.कंत्राटी पध्दतीने मजुर पुरवठा करण्याचे काम सबकॉन्ट्रॅक्टर / कंपनी किंवा इतर व्यक्तींना देता येणार नाही तसे केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीतांचा करार रद्द करण्यात येईल आणि त्यांनतर कार्यालयाचा तसेच विद्यापीठाच्या कोणत्याही प्रक्रियेत संबंधीत कंत्राटदारास भाग घेता येणार नाही.

२०.पुरविण्यात येणा-या कुशल व अकुशल मजुरांचा ई.एस.आय.सी.उतरविणे कंत्राटदारास बंधनकारक राहील. याबाबतची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२१.दरपत्रक मजुर झाल्यानंतर कंत्राटदाराने ठरवून दिलेल्या कामाचा सर्व अटी व शर्तीचा नोटरी कृत करारनामा रु. १०० च्या स्टॅम्पपेपरवर त्वरीत करुन दयावा लागेल.

Scanned with CamScanner

३५.दरपत्रकातील दर सारखे असल्यास संबंधीतांना वाटाघाटीकरीता बोलाविण्यात येवून, कंत्राटदार /संस्थेची वार्षीक उलाढाल तसेच अनुभव इ. बाबी विचारात घेवून अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार दरपत्रक समितीस राहील.

३६. कंत्राटदारांचे दर हे सन २०२२-२३ व २०२३-२४ (३१ मार्च, २०२४ पर्यंत) या वर्षाकरीता लागु राहतील व  शासकीय नियमानुसार किमानवेतन कायदयामध्ये होणारे बदल लागु राहतील, आणि दर जरी ३१ मार्च, २०२४ पर्यंत वैध असले तरी कामाचा कालावधी ११ महिण्याचा राहीलआणि कंत्राट मुदत पूर्ण संपूष्टात आणण्याचा तसेच कंत्राटदाराची सेवा समाधानकारक असल्यास प्रथम आदेशाचा कालावधी संपूष्टात आल्यावर जास्तीत जास्त ३ महिण्यासाठी कंत्राटाचा कालावधी वाढविण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीत अधिका-यास राहील.

३७.उपरोक्त सर्वअटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करणारे कंत्राटदार प्रक्रीयेमध्ये भाग घेण्यास पात्र असतील.

३८.या प्रक्रियेबाबत कुठलेही न्यायालयीन प्रकरण उदभवल्यास अधिकार क्षेत्र वर्धा जिल्हा न्यायालय राहील.

प्रभारी वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख
कृषिविज्ञानकेंद्र, सेलसुरा जि.वर्धा

प्रतिलीपी :प्रभारी अधिकारी, संगणक केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला यांना वरिल सुचना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता अगेषीत.

Scanned with CamScanner

प्रपत्र

| अ.क्र. | मनुष्यबळ | संख्या | कामाचा वेळ प्रती व्यक्ती | शेरा |
|---|---|---|---|---|
| **खालील नुसार कुशल कामगार /मजुर** | | | | |
| १ | कुशल कामगार (कार्यालयीन / प्रयोगशाळा कामकाज) | ०१ | ८ तास | |
| **खालीलनुसार अकुशल कामगार /मजुर** | | | | |
| २ | अकुशल मजुर | ०१ | ८ तास | |

वरिल प्रमाणेदरपत्रक सादर केले असून, त्याबाबतच्या सर्व शर्ती व अटी मला मान्य आहेत.

**पुरवठा/कंत्राटदाराचीस्वाक्षरी**

टिप: दरपत्रक सुचनेमध्ये नमुद शर्ती , अटी व सुचनांमध्ये नमुद कागदपत्रे यासह सादर करण्यात यावीत.

Scanned with CamScanner